| | |
|---|---|
| MHKO180008052022 | **किरकोळ दिवाणी प्रकरण क्र.६२/२०२२**<br>**श्री.मलगोंडा रामु आडे वि.कोणी नाही**<br>**CNR NO. MHKO180008052022** |

## आदेश

(दिनांक ०२ जानेवारी २०२३ रोजी पारित)

अर्जदार नं.१ ते ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा १८२७ चे बॉम्बे रेग्युलेशन प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

### अर्जदारातर्फे थोडक्यात हकीगत अशी की,

२. यातील अर्जदार नं.१ यांची पत्नी व अर्जदार नं.२ व ३ यांची आई सौ.सुरेखा मलगोंडा आडे या होत्या. त्या दि.०५.१०.२०२२ इ.रोजी मयत झाल्या आहेत.

३. मयत सौ.सुरेखा मलगोंडा आडे यांना अर्जदार नं.१ ते ३ हेच वारस आहेत. मयत सौ.सुरेखा आडे या महावितरण, कार्यकारी अभियंता कार्यालय, वं.व.सु.सांगली ग्रामीण विभाग विश्रामबाग सांगली या कार्यालयात उप व्यवस्थापक, (विवले) या पदावर कार्यरत होत्या. त्या नोकरीस असताना अकाली मयत झालेल्या आहेत. अर्जदार नं.२ व ३ पैकी एकास महावितरणकडे अनुकंपा तत्वावर नोकरीस घेणेकरीता अर्जदार हे अर्ज करणार असल्याने त्याकरीता संबंधीत महावितरण खात्याकडून योग्य त्या न्यायालयाकडून वारसा दाखला आणणेबाबत यातील अर्जदार यांना कळविणेत आले. सदर दाखला घेतल्याशिवाय अर्जदार नं. २ व ३ पैकी एकास अनुकंपा तत्वावर नोकरी लागणे शक्य नाही. सबब त्याकरीता अर्जदार यांना हा अर्ज करणे भाग पडत आहे.

४. तसेच मयत सौ.सुरेखा मलगोंडा आडे यांच्या नांवे स्थावर व जंगम मालमत्ता आहेत. त्या मिळकतीस अर्जदार यांची नांवे लावुन घेणेकरीता वारसा दाखला आवश्यक आहे. यासाठीही अर्जदार यांना वारसा दाखला मिळणेकरीता

अर्ज करणे भाग पडले आहे. मयत सौ.सुरेखा मलगोंडा आडे यांना अर्जदारा व्यतिरिक्त अन्य कोणीही कायदेशीर सरळ वारस नाहीत.

५. प्रस्तुत अर्जाची जाहीर नोटीस "दै.महानकार्य" आवृत्ती मध्ये (निशाणी ९) दिनांक ०७/१२/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आली. या कामी मयत सौ.सुरेखा मलगोंडा आडे यांचे बेळगांव, ता.बेळगांवी, जि.बेळगांवी यांनी दिलेल्या मृत्यु दाखल्याची मूळ प्रत (निशाणी १०) असा कागदोपत्री पुरावा आणि अर्जदार श्री.मलगोंडा रामु आडे यांचे सरतपासाचे शपथपत्र (निशाणी ११) दाखल करण्यात आलेले आहे.

**६.** या कामी अर्जाचे स्वरुप व एकंदर पुरावा पाहता माझे समोर खालील नमुद मुद्दे उपस्थित होत आहे -

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार नं.१ ते ३ हे अर्जात नमुद मयत सौ.सुरेखा मलगोंडा आडे यांचे वारस आहेत असा दाखला मिळणेस पात्र आहेत का ? | ....होकारार्थी |
| २ | काय आदेश ? | ....अंतिम आदेशाप्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## *कारणमिमांसा*

**मुद्दा क्र.१ व २ संदर्भात -**

**७.** या कामी अर्जदार श्री.मलगोंडा रामु आडे यांनी शपथेवर जबाब (निशाणी ११) दिलेला आहे. सदर जबाब अर्जातील कथनाला परिपोषक आहे. त्यांनी मयत सौ.सुरेखा मलगोंडा आडे यांचा मृत्यु बेळगांव, ता.बेळगांवी, जि.बेळगांवी येथे झाल्याचे त्यांनी दिलेल्या मृत्यु दाखल्याची मूळ प्रत

(नि.क्र.१०) असा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जास जाहीर नोटीस दिल्यावर कोणीही त्यास हरकत घेण्यास हजर झालेले नाही. अर्जदारांतर्फे सादर केलेल्या पुराव्यास आव्हान देण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर पुरावा स्वीकारणे योग्य व संयुक्तीक होईल.

८. मयत सौ.सुरेखा मलगोंडा आडे यांचे अर्जदार नं.१ ते ३ हे वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. सदर परिस्थितीचा व प्राप्त पुराव्यांचा विचार करता प्रस्तुत अर्जदार नं.१ ते ३ यांना वारसा प्रमाणपत्र देणे योग्य व न्यायोचित होणारे आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ बाबत मी माझा निष्कर्ष होकारार्थी देत असून मुद्दा क्र.२ बाबत मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :-

***आदेश***

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. अर्जदार नं.१ ते ३ हे मयत सौ.सुरेखा मलगोंडा आडे यांचे वारस असल्याचे औपचारीकरित्या प्रमाणित करणेत येत आहे व त्यांचे नांवे योग्य त्या कोर्ट फी स्टॅम्पवर वारसा दाखला (Heirship Certificate) देण्यात यावा.

३. अर्जदार यांनी दिवाणी नियम पुस्तीका (Civil Manual) चे प्रकरण १४ (Chapter XIV) प्रमाणे पुर्तता करावयाची आहे.

Atul Arun Kulkarni
Digitally signed by Atul Arun Kulkarni
Date: 2023.01.07 14:08:20 +0530

(अ.अ.कुलकर्णी)
सह दिवाणी न्या.क.स्तर,कुरुंदवाड

कुरुंदवाड
दि.०२/०१/२०२३

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri.R.L.Mane. |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C.,<br>Kurundwad. |
| Date of Dictation. | 04/01/2023. |
| Judgment/order signed by the PO on | 06/01/2023. |
| Judgment/order uploaded on | 07/01/2023. |